पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५११००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा. क्र.- पोउपआ(मुख्या)/घोडबंदर रोड/अवजड वाहने डायव्हर्जन/अधिसूचना-२५५/२०२५ दि. ५ /०४/२०२५

**मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दित ठाणे-घोडबंदर,राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक नियंत्रण अधिसूचना**

---

**ज्याअर्थी** नवी मुंबई वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रात **दि. ०६/०४/२०२५ रोजी डॉ.डी.वाय.पाटील स्टेडियम, नेरुळ, नवी मुंबई येथे Real Madrid Legends Vs FC Barcelona Legends या दोन जगप्रसिध्द फुटबॉल क्लबमधील माजी खेळाडूंमध्ये सामान्याचे आयोजीत** असून सदर कार्यक्रमास मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याने क्र पोउपआ/वावि/अधिसुचना/ ६०/२०२५ दि. ०४/०४/२०२५ रोजीने ठाणे शहर वाहतूक विभागाने वाहतूक नियत्रंण अधिसुचना जारी केलेली आहे. **त्याकरिता** मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर गुजरात बाजूकडून ठाणे, भिवंडी शहर, कल्याण शहर दिशेकडे जाणा-या तसेच मुंबई व मिराभाईदर शहरातून ठाणे बाजूस जाणा-या सर्व जड-अवजड वाहनांना **प्रवेश बंदी तसेच पार्किंग करण्यास मनाई** बाबत आदेश काढणे आवश्यक आहे. त्यामूळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत तसेच सुनिश्चित राहणे सर्वसामान्य जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे. याकरिता मुंबई- अहमदाबाद महामार्गावर सुरु असलेली जड-अवजड वाहतूक बंद ठेवून पर्यायी मार्गाने वळविणे तसेच रोडवर पार्किंग करण्यास मनाई आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी सुहास बावचे, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उप आयुक्त म्हणून राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होऊन सामान्य जनतेची, प्रवाशांची गैरसोय होवु नये व अपघात होऊ नये यासाठी मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम. व्ही.ए-११६/सीआर/३७/टी.आर,दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**जड-अवजड वाहनांकरीता प्रवेश बंद**

**प्रवेश बंद-** १) राष्ट्रीय महामार्ग क्र ४८- पालघर- विरार बाजूकडून येणारी वाहनांना **शिरसाट फाटा** पासून वरसावे बाजूकडे येण्यासाठी प्रवेश बंद

**पर्यायी मार्ग** – शिरसाट फाटा- पारोळ- अकलोली (गणेशपुरी)- अंबाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद-** २) राष्ट्रीय महामार्ग क्र ४८- पालघर- वसई बाजूकडून येणारी वाहनांना **चिंचोटी** नाक्यापासून वरसावे बाजूकडे येण्यासाठी प्रवेश बंद

**पर्यायी मार्ग** - चिंचोटी मार्गे- कामन- खारबांव- अंजूरफाटा, भिवंडी- मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – ३) पश्चिम दृतगतीमार्ग मुंबई व काशिमीरा बाजूकडून घोडबंदर रोड, ठाणे करीता जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** - सदर वाहने वर्सोवा ब्रिजवरुन सरळ गुजरात राष्ट्रीय महामार्गावरुन शिरसाट फाटा- पारोळ- अकलोली (गणेशपुरी)- अंबाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना **दि.०६/०४/२०२५ रोजी दुपारी १२.३० ते रात्री २३.०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुगणवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व महसूल विभागाची वाहने, मा.जिल्हा दंडाधिकारी मुंबई, ठाणे, पालघर व मनपा आयुक्त, मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी परवानगी दिलेल्या वाहनांना लागू राहणार नाही. **तसेच सर्व हलकी वाहने रोडने ये-जा करण्यास प्रवेश देण्यात येत आहे.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज **दिनांक -०५/०४/२०२५ रोजी** माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

05/04/25

( सुहास बावचे)
पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-**

१. पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पश्चिम उपनगरे, मुंबई
२. पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे
३. पोलीस उप आयुक्त, वाहतूक, ठाणे शहर
४. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मिरारोड, मिरा-भाईंदर वसई-विरार
५. प्रभारी अधिकारी- काशिमीरा, वसई व विरार वाहतूक विभाग
प्रभारी अधिकारी - काशिगांव,नायगांव,वालीव,माणिकपूर,नालासोपारा,विरार पोलीस ठाणे
६. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय

**प्रत –**

१. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, परिमंडळ-२, परिमंडळ-३, मिरा-भाईंदर,वसई-विरार

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

१. मा. अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
३. मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
४. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे
६. मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका